जनसामान्य माणसाचे हक्काचे व्यासपीठ

# दैनिक लोकनेता

बीड

मुख्यसंपादक : ज्ञानेश्वर बुधवत संपादक : ज्ञानेश्वर मुंढे

सोमवार दि.१० मार्च २०२५

हे शब्द आज माझे झाले मुके तरीही !
ते बोलतील भाषा हमखास वादळाची !!
–ॲड.डॉ विजयकुमार कस्तुरे चिखलीकर

सुवर्णसंधी...! दैनिक लोकनेता सुवर्णसंधी...!
पत्रकार होण्यासाठी सुवर्ण संधी
दैनिक लोकनेता (जनसामान्य माणसाचे हक्काचे व्यासपीठ)
अल्पावधीतच वाचकांच्या लेखकांच्या पसंतीत उतरलेल्या दैनिक लोकनेता साठी संपूर्ण महाराष्ट्रात जिल्हा, तालुका शहर व गाव पातळीवर प्रतिनिधी नेमणे आहे.अनुभवी व विनाअनुभवी इच्छुकांनी त्वरित संपर्क साधावा !
संपर्क :- संपादक ८४५९९७७९०४

RNI-MAHMAR/2023/89402 Email : elokneta@gmail.com वर्ष : ०२ अंक :१७६ किंमत २ रुपये Lokneta News - लोकनेता न्युज 8459977904 epaper.lokneta.in

## कारागृह विभागात ५०० कोटींचा घोटाळा

# कारागृहातील घोटाळ्याच्या चौकशीसाठी मुख्यमंत्र्यांनी चौकशी समिती नेमावे-माजी खासदार राजू शेट्टी



■ लोकनेता न्यूज नेटवर्क

**पुणे (वृत्तसंस्था)**

राज्यातील कारागृहामध्ये सन २०२३ ते २०२५ या वर्षांमध्ये रेशन , कँन्टीन व विद्युत उपकरणांच्या खरेदीमध्ये जवळपास ५०० कोटी रूपयाहून अधिक रक्कमेचा घोटाळा झाला नसल्याचा व माझ्या काळातील खरेदी नसल्याचे स्पष्टीकरण तत्कालीन अप्पर पोलिस महासंचालक अमिताभ गुप्ता यांनी हे धांदात खोटे आहे. अमिताभ गुप्ता हे डिसेंबर २०२२ ते जुलै २०२४ या काळात अप्पर पोलिस महासंचालक कारागृह विभाग पुणे येथे कार्यरत होते. अमिताभ गुप्ता यांच्याच काळात कारागृहात अनेक उपकरणांचे खरेदी झाली असून त्यामधील घोटाळ्याची चौकशी पुर्ण करण्यासाठी मुख्यमंत्र्यांनी चौकशी समिती नेमण्याची मागणी स्वाभिमानी शेतकरी संघटनेचे संस्थापक राजू शेट्टी यांनी केली.

राज्यातील कारागृहातील घोटाळ्याबाबत काल झालेल्या पत्रकार परिषदेनंतर तत्कालीन अप्पर पोलिस महासंचालक अमिताभ गुप्ता माझ्या काळातील खरेदी झाले नसल्याचे तर पोलिस महानिरीक्षक जालिंदर सुपेकर यांनी शासनाच्या नियमानुसार खरेदी झाले असल्याचा खुलासा केला आहे. दोन्ही अधिका–यांनी सारवासारव केली असून याबाबत सर्व पुराव्यानिशी माहिती काल पत्रकार परिषदेत दिली असल्याचे शेट्टी यांनी सांगितले. अमिताभ गुप्ता यांनी त्यांच्या काळात अनेक उपकरणे खरेदी केली आहेत. सदरची खरेदी जीएम वरून करत असताना त्या वस्तूंचा त्यावेळचा बाजारातील दर व कारागृह विभागाने खरेदी केलेले दरामध्ये मोठी तफावत आहे. उदा, ३० केव्ही जनरेटरची बाजारातील किंमत ५ लाख ४० हजार असताना कारागृहाने ९ लाख ९० हजार रूपयास खरेदी केली आहे. व्ह्र चे लेसर प्रिंटर ३० हजाराची बाजारात किंमत असून ४९ हजार २२० रूपयांनी खरेदी केली आहे. अमिताभ गुप्ता यांनीच काही मर्जीतल्या ठेकेदारांमार्फत खरेदी करता यावा याकरिता २७ मार्च २०२४ रोजी केंद्रीय पध्दतीने निवीदा करण्याची मागणी शासनाकडे मागणी केली होती.यामुळे सदरच्या भ्रष्ट्राचाराची चौकशी सखोल होण्यासाठी मुख्यमंत्र्यांनी तातडीने चौकशी समिती नेमण्याची गरज असून याबाबत पुढील आठवड्यात मुख्यमंत्री , मुख्य सचिव व गृह सचिव यांना भेटून सदरची चौकशी समिती नेमण्याची मागणी करणार आहे.जर खरोखरच कारागृह विभागात भ्रष्ट्राचार झाला नसेल तर दोन्ही अधिकारी जी वेळ देतील तेंव्हा माध्यमांच्यासमोर त्यावेळचे कारागृहाने खरेदी केलेले दर व त्या वस्तुंचे त्याकाळातील बाजारातील दरपत्रक पुन्हा एकदा सादर करणार असल्याचे शेट्टी यांनी सांगितले.

# भगवानगडाला पौंडूळ (क्र.३) ग्रामस्थांनी सुपूर्द केली ५६ लाख रुपये रोख देणगी

### अवाढव्य खर्चाचे शिवधनुष्य पेलविण्यासाठी सर्व ग्रामस्थांनी सहकार्य करण्याचे आवाहन

■ लोकनेता न्यूज नेटवर्क

**भगवानगड । प्रतिनिधी**




श्री क्षेत्र भगवानगडावरील नियोजित श्री संत ज्ञानेश्वर माऊलींच्या कोट्यावधी रुपये खर्च असणाऱ्या मंदिरासाठी महाराष्ट्रातून मोठ्या प्रमाणात देणग्या सुरू झालेल्या आहेत. गडाच्या भक्तवर्गांपैकी अनेक गावांनी आपापल्या देणग्या जाहीर करून देणगीची रक्कम गडाचे मठाधिपती, न्यायाचार्य डॉ.श्री.नामदेव महाराज शास्त्री बाबांकडे सुपूर्द केली आहे. देणगीचे बाकी असलेले गावकरी बाबांना सप्ताहानिमित्त किंवा इतर धार्मिक कार्यक्रमानिमित्ताने गावात बोलावून बाबांसमोर आपापले देणगीचे आकडे जाहीर करतात. नंतर संपूर्ण ग्रामस्थ एक विशिष्ट तारीख ठरवून बाबांना बोलावून घेतात व जाहीर केलेली देणगी बाबांकडे सुपूर्द करतात.

श्री क्षेत्र भगवानगडाचे विद्यमान मठाधिपती, ह.भ.प.न्यायाचार्य डॉ.श्री.नामदेव महाराज शास्त्री बाबांनी श्री क्षेत्र भगवानगडावर माऊलींचे मंदिर बांधण्याचे ठरविले आणि संपूर्ण महाराष्ट्रातून मंदिरासाठी देणग्यांचा ओघ सुरु झाला आहे. न्यायाचार्य डॉ.श्री.नामदेव महाराज शास्त्री बाबा हे मौजे पौंडूळ नं.३ (ता.शिरुर कासार,जि.बीड) येथे काल्याच्या कीर्तनानिमित्त आले असता ग्रामस्थांनी गडावरील माऊलींच्या मंदिरासाठी देणगी द्यायचे ठरविले. त्यानुसार ग्रामस्थांनी आपापली देणगी श्री क्षेत्र भगवानगडाचे मठाधिपती, श्रीगुरु न्यायाचार्य डॉ.श्री.नामदेव महाराज शास्त्री यांच्याकडे रोख स्वरूपात जमा केली. जमा केलेल्या आकडेवारीनुसार संपूर्ण आकडेवारीची गोळाबेरीज ही ५६ लाख रुपये झाली.नोकरी/व्यवसायानिमित्ताने बाहेरगावी असणाऱ्या ग्रामस्थांच्या देणगीचे आकडे आणखी बाकी आहेत. एकंदरीत श्री क्षेत्र भगवानगडाचा भक्तवर्ग गडावरील माऊलींच्या मंदिराला आर्थिक स्वरुपात हातभार लावण्यासाठी सरसावलेला दिसून येत आहे. त्यामुळे या अभूतपूर्व मंदिरासाठी सर्व ग्रामस्थांनी सहकार्य करावे असे आवाहन श्री क्षेत्र भगवानगड ट्रस्टतर्फे करण्यात आले आहे.

## भारताने चॅम्पियन्स ट्रॉफीवर कोरलं नाव! न्यूझीलंडवर मिळवला ऐतिहासिक विजय

■ लोकनेता न्यूज नेटवर्क

**मुंबई (वृत्तसंस्था)**



भारतीय संघाने ऐतिहासिक कामगिरी करत चॅम्पियन्स ट्रॉफी २०२५ चे जेतेपद पटकावले आहे. भारताने न्यूझीलंडचा अंतिम सामन्यात ४ विकेट्सने पराभव केला. जडेजाने ४९व्या षटकातील अखेरच्या चेंडूवर विजयी चौकार लगावत संघाला विजय मिळवून दिला. भारताने रोहित शर्माच्या नेतृत्त्वाखाली संपूर्ण स्पर्धेत एकही सामना न गमावता ही स्पर्धा आपल्या नावे केली आहे. रोहित शर्माने ७६ धावा करत सामन्याचा सामनावीर ठरला.

भारताच्या विजयासह टीम इंडिया चॅम्पियन्स ट्रॉफीचे जेतेपद तिसऱ्यांदा पटकावणारा पहिला संघ ठरला. यासह भारताने गेल्या १० महिन्यात दुसरी आयसीसी स्पर्धा जिंकत ट्रॉफी आपल्या नावे केली.

न्यूझीलंडने दिलेल्या २५२ धावांच्या लक्ष्याचा पाठलाग करताना भारताचा कर्णधार रोहित शर्माने वादळी खेळी करत संघाच्या विजयाच्या पाया रचला. रोहित शर्माने ८३ चेंडूत ७ चौकार आणि ३ षटकारांसह ७६ धावा केल्या, तर शुबमन गिलने ५० चेंडूत एका षटकारासह ३१ धावा केल्या. श्रेयस अय्यर आणि अक्षर पटेलच्या भागीदारीने भारताला सामन्यात कायम ठेवलं. श्रेयस अय्यर ६२ चेंडूत २ चौकार २ षटकारांसह ४८ धावा करत बाद झाला. तर अक्षर पटेलने ४० चेंडूत १ चौकार १ षटकारासह २९ धावा करत बाद झाला. तर राहुल आणि हार्दिकने भारताला विजयाच्या उंबरठ्यावर नेले. तर रवींद्र जडेजाने विजयी चौकारासह भारताच्या विजयावर शिक्कामोर्तब केला.

## सीसी आयची बंद कापूस खरेदी केंद्र त्वरित सुरू करा

# आमदार देवराव भोंगळे यांची मंत्री जयकुमार रावल यांचेकडे मागणी

■ लोकनेता न्यूज नेटवर्क

**कोरपना । प्रदीप मडावी**



चंद्रपुर जिल्ह्यासह संपुर्ण महाराष्ट्रात कॉटन कॉर्पोरेशन ऑफ इंडिया (उउख) चे कापुस खरेदी केंद्रे मुदतीआधीच अचानक बंद करण्यात आली असल्याने शेतकऱ्यांना आपला कापुस खासगी व्यापाऱ्यांकडे कमी दराने विक्री करावा लागत आहे. त्यामुळे सीसीआयकडून बंद करण्यात आलेली कापुस खरेदी केंद्रे तातडीने सुरू करण्याचे निर्देश संबंधितांना द्यावे, अशी मागणी राजुरा विधानसभा मतदारसंघाचे आमदार श्री. देवराव भोंगळे यांनी राज्याचे पणन मंत्री ना. जयकुमारजी रावल यांचेकडे निवेदन देऊन केली आहे.

विदर्भ हा महाराष्ट्रातील ३०% कापूस उत्पादन करणारा प्रमुख प्रदेश असून विशेषतः राजुरा विधानसभा मतदारसंघात मोठ्या प्रमाणात कापुस उत्पादन होते. परंतू सीसीआयने आपली कापुस खरेदी केंद्रे बंद केली असल्याने ७ हजार ४२० रूपये प्रती क्विंटल सरकारी हमीभावापेक्षा ६ हजार ८०० इतक्या कमी दराने शेतकऱ्यांना आपला कापुस खाजगी व्यापाऱ्यांना विकावा लागत आहे. त्यामुळे कापुस उत्पादक शेतकरी अडचणीत सापडला असून योग्य पर्यायाअभावी अजुनही हजारो शेतकऱ्यांच्या घरात विक्रीविना कापूस पडून आहे. त्यासाठी शासनाने या गंभीर विषयाकडे तातडीने लक्ष घालून सीसीआयने बंद केलेली कापुस खरेदी केंद्रे पुर्ववत सुरू करावी अशी मागणी आमदार श्री. देवराव भोंगळे यांनी राज्याचे पणन मंत्री ना. जयकुमारजी रावल यांना निवेदन देत केली आहे.

# बहुजन साहित्य संमेलनाच्या स्वागताध्यक्षपदी डॉ.संघर्ष सावळे

■ लोकनेता न्यूज नेटवर्क

**छ. संभाजीनगर । प्रतिनिधी**



बहुचर्चित बहुजन साहित्य संघ, चिखली, जि. बुलढाणा च्या वतीने मातृतीर्थ सिंदखेडराजा नगरीतील मातोश्री मंगल कार्यालयात संपन्न होणार असलेल्या दि. ३१–०३–२०२५ रोजी च्या बहुजन साहित्य संमेलनाचे अध्यक्षपद, भारतभर आपल्या उर्दू शायरी मुळे सुप्रसिद्ध असलेले बुलढाणा येथील, शायर डॉ. गणेश गायकवाड यांनी तद्वतच संमेलनाचे उदघाटन आपल्या शुभहस्ते करण्याची जबाबदारी भारत सरकारच्या केंद्रीय मंत्रालयातील आयुष मंत्री तथा बुलढाणा जिल्ह्यातील लोकप्रिय खासदार मा. ना. प्रतापराव जाधव यांनी सहर्ष स्विकारल्याची बातमी या अगोदर सर्व मान्यवर नागरिक रसिकांना विविध वृत्तपत्रे आणि वृत्तवाहिन्या द्वारे वाचण्यास व पाहण्यास मिळालीच आहे. आणि आज या सर्व जण आतूरतेने वाट पाहत असलेल्या सहाव्या बहुजन साहित्य संमेलनाचे स्वागताध्यक्ष हे बहुमानाचे पद अगदी तरूण वयात स्कॉटलंड यार्ड स्टुडंट्स ब्रँड म्बेसेडर या पदावर पुनर्नियुक्त झालेले तथा डॉ. बाबासाहेब आंबेडकर मराठवाडा विद्यापीठ, छ. संभाजीनगर च्या अर्थशास्त्र विभागाचे प्राध्यापक असलेल्या तथा साहित्यिक क्षेत्रात अगदी अंतर्राष्ट्रीय स्तरावर विविध संमेलनांचे आयोजन करणाऱ्या साहित्यधारा बहुउद्देशीय सेवाभावी संस्था, छ.संभाजीनगरचे संस्थापक अध्यक्ष डॉ. संघर्ष सावळे यांनी स्विकारले असून तसे सन्मान पत्र त्यांना, छ. संभाजीनगर येथील त्यांच्या निवासस्थानी जाऊन ब. सा. सं.चे अध्यक्ष डॉ. विजयकुमार कस्तुरे, डव्होकेट, चिखली, उपाध्यक्ष डॉ. बबनराव महामुने छ. संभाजीनगर, सचिव डॉ. डी. व्ही.खरात सर आणि संघटक भावकवी अंकुश पडघान, बोरगाव काकडे यांनी प्रदान केले.



देगलूर येथे गेल्या दोन तीन दिवसांपासून पाणीपुरवठा खंडित झाल्यामुळे दैनिक लोकनेता चे पत्रकार धनाजी जोशी यांनी देगलूर नगर परिषदेला सांगुन जोशी गल्ली येथे पाण्याचे टँकर उपलब्ध करून दिले.(लोकनेता न्युज नेटवर्क देगलुर)

## पोलीस स्टेशन नांदेड ग्रामीण येथे जागतिक महिला दिन साजरा

■ लोकनेता न्यूज नेटवर्क

**नवीन नांदेड । सुनिल शिंदे**



८ मार्च जागतिक महिला दिना निमित्ताने पोलीस स्टेशन नांदेड ग्रामीण येथे आलेल्या सर्व तक्रारदार महिला व कार्यरत पोलीस महिला पोलीस कर्मचारी पोलीस यांना निरीक्षक चिंचोलकर यांच्या वतीने भेटवस्तू व पुष्पगुच्छ देऊन शुभेच्छा देण्यात आल्या.

जागतिक महिला दिनाच्या निमित्ताने तक्रारदार महिलांच्या अडीअडचणी जाणून घेण्यात आल्या महिला सुरक्षेसंदर्भात त्यांना मार्गदर्शन करण्यात आले.डायएल ११२ बाबत माहिती देण्यात आली.

पोलीस स्टेशन नांदेड ग्रामीण येथे कार्यरत असलेल्या सर्व पोलीस महिला अंमलदार यांना जागतिक महिला दिनाचे औचित्य साधून भेटवस्तू व पुष्पगुच्छ देऊन शुभेच्छा देण्यात आल्या यावेळी सहाय्यक पोलीस निरीक्षक विजय कांबळे,उपनिरीक्षक ज्ञानेश्वर मठवाड, बाबुराव चव्हाण यांच्या सह पोलीस कर्मचारी उपस्थित होते.

# लयबद्ध, भावनिक आणि प्रामाणिक विचार यांचा समतोल साधणारे पुस्तक म्हणजे 'जपणूक वेदणेची'–चंद्रकांत कुलकर्णी

■ लोकनेता न्यूज नेटवर्क

**गेवराई । ज्ञानेश्वर उदावंत**

येथील प्रसिद्ध विधिज्ञ, वकील संघाचे माजी अध्यक्ष , लेखक, नाटककार, कलावंत ड. कमलाकर देशमूख यांच्या स्वरूप प्रकाशन, पुणे यांच्या वतीने प्रकाशित जपणूक वेदणेची या पुस्तकाचा प्रकाशन सोहळा दिनांक २ मार्च रोजी तथास्तू मंगल कार्यालय येथे संपन्न झाला.कोणत्याही साहित्य निर्मितीचा दर्जा त्याच्या प्रामाणिक मांडणी, भाषाशैली आणि प्रभावी मांडणीवरच अवलंबून असतो आणि नेमका तसाच यशस्वी परिणाम ड . कमलाकर देशमूख यांच्या ' जपणूक वेदणेची ' या पुस्तकातून प्रत्ययाला येतो. लेखकाच्या हृदयस्पर्शी भावभावनांचा अनुभव प्रत्यक्ष वाचकाला येत असल्यामुळे साहजिकच वाचक या पुस्तकाचे संपूर्ण वाचन केल्याशिवाय स्वस्थ बसू शकत नाही . ते ड. कमलाकर देशमुख यांनी या पुस्तकात शब्दबद्ध केलेल्या जपलेल्या वेदनांचे यश आहे. राष्ट्रपती पुरस्कार प्राप्त प्रसिद्ध सिने दिग्दर्शक चंद्रकांत कुलकर्णी यावेळी पुस्तकावर बोलताना त्यांच्या भूतकाळात गेले. देशमुखांचे घर व आज या जगात नसलेल्या परंतु मनात कायम असलेल्या कुटुंबातील प्रत्येक सदस्यांच्या आठवणीने ते भावुक झाले. 'जपणूक वेदनेची' ह्या पुस्तकाला कवितेप्रमाणे एक प्रकारची लय आहे. हे पुस्तक किती पानी आहे हे महत्वाचे नसून त्यावर भरभरून लिहिली जाणारी समीक्षा पुस्तकाचे महत्व दाखवून देते, असे सांगत चंद्रकांत कुलकर्णी यांनी पुस्तक आणि लेखक यांचा गौरव केला.

या पुस्तक प्रकाशन सोहळ्याचे अध्यक्ष , मराठवाड्यातील प्रसिद्ध साहित्यीक, लेखक प्रा. डॉ . वासूदेव मुलाटे यांनी या पुस्तकातील लेखनाची



भाषा, मांडणी आणि संवेदना ही उच्च दर्जाची असून मराठवाड्यातील आत्मकथन ग्रंथांमध्ये या दर्जेदार लेखनशैलीचा समावेश होईल. वानप्रस्थाश्रमचा खरा अर्थ समजलेला व अस्तित्वाचे भान असलेला लेखक म्हणजे ड. कमलाकर देशमुख असे डॉ. मुलाटे यांनी नमूद केले. तसेच हे पुस्तक थेट हृदयाचा हृदयाशी संवाद साधणारे आहे असे मत त्यांनी व्यक्त केले.या पुस्तकातील अनेक प्रसंगांच्या साक्षीदार असलेल्या लेखकाची पत्नी या नात्याने रागिणी देशमूख यांनी मोजक्या शब्दात कौटूंबिक व्यवस्थापन आणि संवर्धन, नातेसंबंध आणि संवाद, वाडा संस्कृती आणि संस्कार तसेच एकत्र कुटूंब संस्कृतीतील दुर्मिळ होत चाललेली नात्यांची वाण जपण्याचा अनुभवलेला आनंद त्यांनी आपल्या ओघवत्या शैलीने व्यक्त करत रसिकांची मने जिंकली . प्रमूख उपस्थितीतील प्रा.डॉ. दहीफळे यांनी पुस्तकाविषयी आपले विचार व्यक्त केले. लेखकाचे व्याही श्री राजीव कुलकर्णी यांनी आतापर्यंत 'देशमुख या आडनावाचा भितीचा दरारा माहीत होता परंतु आज प्रेमाचा दरारा अनुभवायला मिळाला' असे मत त्यांच्या भाषणातून व्यक्त केले. एकापेक्षा एक सरस वक्त्यांनी गाजवलेल्या या कार्यक्रमाला उंचीवर नेणारे समर्पक व बहारदार सुत्रसंचालन अमृता देशमुख व प्रा. डॉ. चिन्मय देशमुख यांनी केले.शेवटी डॉ. हेमंत वैद्य यांनी आभार मानले. या प्रसंगी गेवराई शहरातील विविध क्षेत्रातील मान्यवर , कलावंत, साहित्यीक व प्रतिष्ठित नागरिक व महिला मोठ्या संख्येने उपस्थित होते.

# तक्रारवाडी ग्रा.पं.आणि ग्रामस्थांच्या वतीने कर्तृत्ववान महिलांचा गौरव

■ लोकनेता न्यूज नेटवर्क

**इंदापूर । बबनराव धायतोंडे**

जागतिक महिला दिनाचे औचित्य साधून तक्रारवाडी ग्रामपंचायत आणि ग्रामस्थांच्या वतीने कर्तृत्ववान महिलांचा गौरव करीत त्यांच्या कार्याला सलाम करण्यात आला. ग्रामपंचायत तक्रारवाडी गावच्या सरपंच,उपसरपंच,ग्रामसेविका,आरोग्य अधिकारी,वायरमन,आरोग्य सेविका,अंगणवाडी सेविका,स्वस्त धान्य दुकानदार,जिल्हा परिषद शाळेचे केंद्रप्रमुख,महिला शिक्षिका, ग्रामपंचायत महिला सफाई कर्मचारी या सर्वच पदावर महिला काम करत असल्यामुळे दररोजच महिला दिन असतो मात्र त्यांच्या कार्याचा आजच्या दिवशी सन्मान करण्यात आला.



या जन्मात देवाला जितके महत्व दिले जाते तितकेच महत्व ' ती 'ला म्हणजे महिलेला दिले जाते.ती कधी आई असते तर कधी ताई असते तसेच ती जिवनदायीनी आणि करुणासागर असते.याच महिलांचा सन्मान व्हावा म्हणून आजच्या दिवशी महिलादिन साजरा केला जातो.इंदापूर तालुक्यातील महत्वाच्या मानल्या जाणाऱ्या तक्रारवाडी ग्रामपंचायत आणि ग्रामस्थांच्या वतीने आज हा सन्मान घेण्यात आला.यावेळी सरपंच मनिषा वाघ,उपसरपंच आशाताई जगताप,ग्रामपंचायत सदस्या संगीता वाघ,प्राजक्ता वाघ,ग्रामसेविका शोभा जाधव,उपकेंद्र आरोग्य अधिकारी डॉ.मृदुला जगताप,वीज मंडळ कर्मचारी गीतांजली कंठाळ,कृषी अधिकारी पल्लवी काळे स्वस्त धान्य दुकानदार पार्वती जगदाळे,जिल्हा परिषद शाळा केंद्र प्रमुख मनिषा दुर्गे,राष्ट्रवादी तालुका महिला उपाध्यक्षा सिमा काळंगे,आरोग्य सेविका स्वाती शिंदे,ज्योती जगताप,साधना वाघ तसेच मदनवाडी गावच्या माजी सरपंच आम्रपाली बंडगर यांचा यावेळी बहुमान करण्यात आला.यावेळी सरपंच मनिषा वाघ,विलास गडकर,महेश वाघ,मुख्याध्यापक राजेश नाचन,सिमा काळगे यांनी आपले मनोगत व्यक्त केले. यावेळी माजी सरपंच सतीश वाघ,शरद वाघ,अंजना थोरात,गौरी काळंगे,दिपाली वाघ,मनीषा चौधरी,शोभा पिसाळ,कविता वाघ ,संगीता खडके,तेजस्विनी भोसले,नंदा साळुंखे,तसेच सर्व शिक्षक वर्ग आणि ग्रामस्थ मोठ्या संखेने उपस्थित होते.कार्यक्रमाचे नियोजन ग्रामपंचायत तक्रारवाडी,ग्रामस्थ तक्रारवाडी,शिक्षक वृंद जिल्हा परिषद शाळा यांच्या वतीने करण्यात आले होते तर आभार मनिषा चौधरी यांनी मानले.

# ,भारत गौरव विशेष पर्यटक रेल्वेला हिरवी झेंडी दाखवून मुख्यमंत्री तिर्थ दर्शन यात्रेला नांदेड येथून सुरुवात

■ लोकनेता न्यूज नेटवर्क

**नांदेड । बाजीराव पाटील**

हुजुर साहिब नांदेड रेल्वे स्थानकावर महाराष्ट्र शासनाच्या मुख्यमंत्री तीर्थदर्शन योजने अंतर्गत भारत गौरव विशेष पर्यटक ट्रेन द्वारे पवित्र व पावन अयोध्याधाम येथे प्रभु श्री रामचंद्रांच्या दर्शनासाठी जाणाऱ्या भाविकांना शुभेच्छा देण्यात आल्या. आ.हेमंत पाटील साहेब,आ.आनंदराव पाटील बोंढारकर साहेब ,खा.डॉ.अजितजी गोपछडे साहेब यांच्या हस्ते यात्रेकरूंच्या सुखमय प्रवासासाठी रेल्वेला हिरवी झेंडी दाखवून यात्रेचा शुभारंभ करण्यात आला. त्याप्रसंगी विधान परीषद सदस्य आमदार हेमंत पाटील, भाजपा मराठवाडा संघटन मंत्री संजयभाऊ कौडगे,आमदार डॉ.तुषारजी राठोड,आमदार आनंद पाटील



बोंढारकर, आमदार बाबुराव कोहळीकर, भाजपा जिल्हासरचिटणीस लक्ष्मणराव ठक्करवाड, मिलिंद देशमुख, दत्ता पाटील कोकाटे, माणिकराव लोहगावे, खुशाल पाटील उमरदरीकर, बालाजी पाटील शेळगावकर शिवाजीराव पाटील, रुपेश पाटील भोकसखेडकर आदी मान्यवर उपस्थित होते.


सर्व उपस्थित मान्यवरांनी भाविकांना अयोध्या यात्रेसाठी मनःपूर्वक शुभेच्छा दिल्या व या धार्मिक यात्रेद्वारे भक्तांना आध्यात्मिक लाभ मिळावा, अशी अपेक्षा व्यक्त केली.

# डिजिटल मीडिया संपादक पत्रकार संघाने केला महिला पत्रकारांचा सत्कार

■ लोकनेता न्यूज नेटवर्क

**लातूर । इस्माईल महेबूब शेख**

दिनांक. ८ मार्च ला आंतरराष्ट्रीय महिला दिवसानिमित्त चंद्रपूर जिल्हा डिजिटल मीडिया संपादक पत्रकार संघाच्या वतीने स्थानिक जटपुरा गेट जवळील जिल्हाध्यक्ष मुन्नाभाऊ तावाडे यांचे जनसपर्क कार्यालयात दुपारी ३ वाजताचे दरम्यान शहरातील महिला पत्रकारांना निमंत्रित करून सर्व पत्रकारांना जेष्ठ समाजसेविका माननीया नम्रताताई ठेमस्कार यांचे हस्ते शाल, पुष्पगुच्छ व महिलांसाठी असलेल्या सरकारी कायद्याचे माहिती पुस्तक देऊन सन्मानपूर्वक सत्कार करण्यात आला. कार्यक्रमाचे अध्यक्षस्थानी डिजिटल मीडिया संपादक संघाचे अध्यक्ष मा. मुन्नाभाऊ तावाडे तर प्रमुख अतिथी म्हणून जिल्हा सहसचिव मा. दीपक कटकोजवार, तालुका अध्यक्ष मा.कांबळे यांची उपस्थिती होती. फोटो मध्ये सत्कारमूर्ती व प्रशिक्षित मास्टर ऑफ मास कम्युनिकेशन ची पदवी असलेल्या जर्नलिस्ट



माधुरी कटकोजवार यांचा सत्कार आला तो क्षण. याप्रसंगी शहरातील मान्यवर पत्रकार बंधू भगिनी मोठ्या संख्येने उपस्थित होते.

# ईरगाव येथे भव्य अखंड हरिनाम सप्ताह व शिवपुराण कथा वाचन धार्मिक कार्यक्रम मोठ्या उत्साहात संपन्न

■ लोकनेता न्यूज नेटवर्क

**किनवट । दशरथ आंबेकर**

दरवर्षी प्रमाणे याही वर्षी मौजे ईरगाव तालुका किनवट येथील गांवकऱ्यांच्या वतीने हनुमान मंदीर पटांगणात भव्य अखंड हरिनाम सप्ताह व शिवपुराण कथा वाचन असा धार्मिक उत्सव सोहळा आयोजित करण्यात आला होता. यामध्ये दररोज सकाळी पासुन अखंड हरिनाम सप्ताह व ज्ञानेश्वरी पारायण कथा, शिवपुराण कथा सोहळ्याचे आयोजन दि.०२ मार्च ते ०९ मार्च २०२५ पर्यंत शिवपुराण कथाकार ह.भ.प.स्वामी भिमाशंकर महाराज पेंदेकर यांच्या मधुर वाणीने संपन्न झाला आहे.तर गांवकऱ्यांच्या सहकार्याने गेल्या १० वर्षापासुन अखंड हरिनाम सप्ताहाचे आयोजन केले जाते. दरवर्षी प्रमाणे यंदाही त्यांच्याच अमृत वाणीतुन संपन्न झाला आहे. त्यामध्ये दर दिवशी सकाळी पाच ते सहा वाजे दरम्यान



काकडा आरती,दुपारी एक ते चार वाजता शिवपुराण कथा वाचन व सायंकाळी पाच ते सात हरिपाठ तसेच रात्री साडेआठ ते साडेदहा पर्यंत हरी किर्तनाचा कार्यक्रम संपन्न झालेला आहे. यामध्ये सात दिवस विविध किर्तनकार यांच्या अमृत वाणीतुन कीर्तनाचा कार्यक्रम संपन्न झाला आहे.शेवटी दिं.९ मार्च २०२५ रविवारी रोजी सकाळी गावातुन डोक्यावर कळस घेऊन मुख्य मार्गाने मिरवणुक व शोभायात्रा काढण्यात आली होती. शोभायात्रा सकाळी ९ ते ११ वाजेपर्यंत काढण्यात आली. त्या नंतर काल्याचे किर्तन ह.भ.प. दत्तात्रय महाराज वळसन वाडीकर यांचे भव्य असे काल्याचे किर्तन होऊन शेवटी महाप्रसाद वाटप करण्यात आला आहे.कार्यक्रमाचा समारोप गांवकऱ्यांया वतीने करण्यात आला आहे. या धार्मिक कार्यक्रमात गांवकरी भजनीं मंडळ ईरगावकर यांनी साथसंगत केली होती.

## निधन वार्ता



सिंदखेड राजा तालुक्यातील निमगाव वायाळ येथील लक्ष्मण ग्यानुजी हुसे मेकॅनिक यांचे दि. ९ ला दुःखद निधन झाले मृत्यु समयी त्यांच्या वय ७२ वर्ष होते त्यांच्या पश्चात पत्नी, दोन मुले असा परिवार आहे पत्रकार सुरेश हुसे यांचे ते वडील होते.

### प्रशासन मात्र मेहेरबान झाल्याचं चित्र दिसून येत

# धानोरा बु.घरकुल योजनेचा लाखोंचा घोटाळा प्रकरणाची कारवाई गुलदस्त्यात

■ लोकनेता न्यूज नेटवर्क

**उमरी । महेश पडोळे**

पंचायत समिती अंतर्गत येणाऱ्या ग्रामपंचायत मध्ये मोठ्या धूम धडाक्यात शासनाच्या विविध घरकुल योजनेचे लाभार्थी घरकुलाचे बांधकाम करीत आहेत. तर दुसरीकडे कुठलेही घरकुलाचे बांधकाम न करता शासनाच्या डोळ्यात धूळ झोकून सरपंच ग्रामसेवक यांना डावलून पं.स.कर्मचारी यांच्या संगनमताने बिना घरकुलाचे बांधकाम करता प्रत्येक लेव्हलचे बनावट प्रमाणपत्र सादर करून बोगस घरकुल लाभार्थ्यांनी शासनाच्या निधीची उचल केल्याचा धक्कादायक प्रकार उमरी पंचायत समिती अंतर्गत येणाऱ्या धानोरा बु.ग्रामपंचायतमध्ये सुरू आहे.

राज्यातील गरीब गरजू अती गरजू लोकांसाठी राबविण्यात येणाऱ्या प्रधानमंत्री आवास योजना, शबरी घरकुल योजना, रमाई आवास घरकुल योजना, वसंतराव नाईक घरकुल योजना आणि सद्या नव्यानेच सुरू करण्यात आलेली मोदी आवास योजना यासारख्या घरकुल योजनांमध्ये ग्रामपंचायत हद्दीतील त्या–त्या प्रवर्गातील पात्र गरजू लाभार्थ्यांना घरकुल योजनेचा लाभ देण्यासाठी अटी व शर्तीच्या अधीन राहून घरकुल बांधणाऱ्या लाभार्थ्यांनाच घरकुल योजनेचा लाभ देण्यात येतो. मात्र उमरी पंचायत समिती अंतर्गत येणाऱ्या धानोरा बु. ग्रामपंचायतीमध्ये चक्क घरकुलाचे आणि शेवट संपूर्ण घरकुलाचे बांधकाम न करता कोनी बांधकाम दुसर्याच दाखवलं कोनाच यादित ना नाव ना नावे घर असे घरकुल बांधकाम करीत असल्याचा बनाव करून सरपंच ग्रामसेवक यांच्या कडून घरकुल बांधकामाचे प्रमाणपत्र न



घेताच सादर करून शासनाची निधी लाटण्याचे काम सुरू आहे.

कोणत्याही योजनेतील घरकुल मंजूर झाल्यानंतर सबंधित लाभार्थ्यांचा करारनामा होताच घरकुल लाभार्थ्यांच्या खात्यात पंधरा हजार रुपयाचे धनादेश टाकल्या जाते. नंतर लाभार्थ्याला रीतसर घरकुलाचे बांधकाम पूर्ण करायचे असते त्यात लाभार्थाने फोंडेशन लेव्हल, लिटल लेव्हल, स्लॅब लेव्हल आणि शेवट संपूर्ण घरकुलाचे बांधकाम झाल्यानंतर पूर्णत्वाचे प्रमाणपत्र सादर केल्यानंतर घरकुलाचे धनादेश पंचायत समिती स्तरावरून अदा केले जाते. हे धनादेश अदा करीत असताना ग्रामपंचायत सरपंच ग्रामसेवकाने त्या त्या लेव्हल चे पूर्णत्वचे प्रमाणपत्र दिल्याशिवाय आणि जिओ ट्यागिंग केल्या शिवाय धनादेश अदा केले जात नाही. मात्र उमरी पंचायत समिती अंतर्गत येणाऱ्या धानोरा बु.ग्रामपंचायत मध्ये चक्क घरकुलाचे कोणतेही बांधकाम न करता करारनामा करून सरपंच, ग्रामसेवक,शासनाच्या डोळ्यात धूळ झोकून यांच्या संगनमताने बिना घरकुलाचे बांधकाम करता प्रत्येक लेव्हलचे बनावट प्रमाणपत्र सादर करून बोगस घरकुल लाभार्थ्यांनी शासनाच्या निधीची उचल केले आहे.

सबंध प्रकार करीत असताना किती लोकांचे हात लाला झाले याचे बिगूल लवकरच जनतेपुढे येणार आहे.उमरी पंचायत समिती अंतर्गत धानोरा बु.ग्रामपंचायत मध्ये सुरू असलेल्या बोगस घरकुलाची चौकशी नवनियुक्त जिल्हाधिकारी, जिल्हा परिषद मुख्याधिकारी करणार काय? या बोगस घरकुल लाभार्थ्यांना बडावा देणाऱ्या संबंधितावर कठोर कार्यवाही करणार काय? याकडे यांच्या संगनमताने बिना घरकुलाचे धानोरा बु.वाशियांचे लक्ष वेधून लागले आहे.यात अनेक वेळा विविध प्रसारमाध्यमांतून वृत्तपत्रात बातम्या सादर केल्या गेले पण प्रशासनास घाम फुटला नाही म्हणून प्रशासन यांच्यावर मेहेरबान होऊन आदा तेरा आदा मेरा असं झाल्याचं चित्र दिसून येत आहे व अशी चर्चा नागरिकांतून होत आहे.

## उपजिल्हा रुग्णालय व पंचायत समितीच्या वाढत्या तक्रारी

# लक्ष द्या जनतेची कामे वेळेत करा आ.प्रतापराव चिखलीकर यांचे निर्देश

■ लोकनेता न्यूज नेटवर्क

**लोहा । विशाल घंटे**

उपजिल्हा रुग्णालयात वेळेवर रुग्णाला वेद्यकीय सेवा मिळत नाही. डॉक्टर नसतात कर्मचारी येत नाही त्यामुळे रुग्ण व नातेवाईक यांची हेळसांड होतेय.असा तक्रारी आहेत पंचायत समितीत घरकुल व अन्य योजनेच्या असंख्य तक्रारी आहेत. वीज विभागाने वेळत डीपी द्यावेत. तसेच मार्केट कमिटीने व्यापाऱ्याना जादा फीस आकारणी करू नये . सर्व विभागाम्याने जनतेची कामे वेळेत करावे तक्रारी येऊ देऊ नका. जनतेची कामे वेळेवर करावीत शासकीय योजनांची अंमलबजावणी प्रभावीपणे करावी असे निर्देश आ. प्रतापराव पाटील चिखलीकर यांनी दिले.



लोहा तहसील कार्यालयात आ. प्रतापराव पाटील चिखलीकर यांच्या अध्यक्षतेखाली तालुका समन्वय समितीची बैठक पार पडली . या बैठकीस उपविभागीय अधिकारी अरुणा संगेवार तहसीलदार विठ्ठल परळीकर कंधार तहसीलदार रामेश्वर गोरे, प्रविण पाटील चिखलीकर, गटविकास अधिकारी डी. के आडेराघो, माणिकराव मुकदम, हंसराज पाटील बोरगावकर, बालाजी पाटील मारतळेकर, माजी नगराध्यक्ष किरण वट्टमवार , सचिन पाटील चिखलीकर , कंधार माजी नगराध्यक्ष स्वप्नील पाटील लुंगारे माजी उपनगराध्यक्ष केशवराव मुकदम, छत्रपती धुतमल,जफारोद्दीन बहोद्दीन , दत्ता वाले, करिम शेख, वाबाराव पाटील गवते, पंचशील कांबळे, भास्कर पवार, मुख्याधिकारी श्रीकांत लाळगे,उपजिल्हा रुग्णालयाचे प्रभारी अधीक्षक डॉ प्रशांत जाधव बांधकाम उपअभियंता (जिप) शिवाजी राठोड सां बां उपविभागाचे उपअभियंता मोहनराव पवार, तालुका आरोग्य अधिकारी डॉ कांबळे, बीईओ सतीश व्यवहारे, विद्युत मंडळाचे उपकार्यकारी अभियंता एन. के सुतार, शहर अभियंता श्री स्वामी, दुय्यम उपनिबंधक, डहाळे मारुती पाटील ,साहेबराव काळे गुरुजी ,बालाजी पाटील सावरगावकर दिनेश तेल्लवार , समीर कंधार नायब तहसील मोकले यासह सर्व विभाग प्रमुख उपास्थित होते.

### नगर परिषदेच्या कामाची दखल

**नगर परिषदेच्या प्रशासक उपविभागीय अधिकारी अरुणा संगेवार, मुख्याधिकारी श्रीकांत लाळगे व त्याची टीम चांगली काम करत आहेत प्रलंबित घरकूल योजनेत मुख्याधिकारी लाळगे हे लाभार्थ्यांना अनुदान वाटप वेगाने करत आहेत .कार्यालयीन शिस्त लावण्यात त्यांना यश येते आहे असा शब्दात आमदार चिखलीकर यांनी शाबासकी दिली शहराच्या कामासाठी निधी उपलब्ध करु देण्यासाठी प्रमुख पदाधिकारी व मुख्याधिकारी यांनी एकत्रित बसवून प्रस्ताव तयार करावेत निधी उपलब्ध करू असे आश्वासित केले.**

# जागतिक महिला दिना निम्मित हिवरा,माहेरखेडा,केंद्रा (खुर्द) या ग्रामपंचायतला आयुष्यमान कार्डचा कॅम्प संपन्न

■ लोकनेता न्यूज नेटवर्क

**सेनगाव । महादेव हरण**

सेनगाव पंचायत समिती चे कर्तव्यदक्ष गटविकास अधिकारी माधव कोकाटे हे सेनगाव तालुक्यातील ग्रामपंचायतीला भेटी देत आहेत, त्यामुळे ग्रामपंचायत स्तरावर सर्वच केंद्र चालक हे कामाकडे लक्ष देत आहेत, गटविकास अधिकारी कोकाटे हे गोपनीय ग्रामपंचायतला भेट देत आहेत, त्यामुळे ग्रामपंचायतीचे सर्वच कर्मचारी कामाला लागले आहेत. आज दिनांक आठ मार्च रोजी हिवरा माहेरखेडा तसेच केंद्रा खुर्द येथे आयुष्यमान कार्ड चा कॅम्प आयोजित केला होता. यावेळी केंद्र चालक गणेश खताळ, विशाल इंगोले, लक्ष्मण पतंगे, सुरेद्र प्रधान, पुरुषोत्तम वैद्य,



गजानन पारीस्कर, सुनील शिंदे, सौ. सुनीता विठ्ठल जाधव , भैया देशमुख , यांनी सर्वांनी मिशन मोड मध्ये आयुष्यमान कार्ड काढले... यावेळी हिवरा येथील आशाताई छाया गायकवाड, माहेरखेडा येथील आशाताई कविता उचित, केंद्रा खू येथील आशाताई किरण ताई झिंजाडे तसेच ग्रामपंचायत कर्मचारी गोपाल शिरसाट, ग्रामपंचायत कर्मचारी शंकर जुमडे, तसेच रोजगार सेवक गणेश अंभोरे, प्रभाकर तायडे , तसेच कैलास गवळी, आणि गावातील प्रतिष्ठित नागरिक हे सर्व जण उपस्थित होते तसेच सरपंच महोदय लक्ष्मीबाई माधव लांडगे यांनी सुद्धा कॅम्पला सहकार्य केलेले आहे यावेळी हिवरा माहेरखेडा येथील १२८ आयुष्यमानचे कार्ड काढण्यात आलेले आहेत, तसेच केंद्राखू येथिल २३ कार्ड काढण्यात आलेले आहेत यावेळी ग्रामपंचायत अधिकारी श्री.भोसले, श्री. गोरे आणि पंचायत समितीचे तालुका समन्वयक विनोद बनसोडे यांनी आयुष्यमान कार्ड चे आयोजन केले होते तसेच आयुष्यमान कार्ड काढण्यासाठी ग्रामपंचायत स्तरावरील जो कोणी कर्मचारी कामात दिरंगाई करत असेल त्यांच्यावर योग्य ती कारवाई करण्यात येईल असे गटविकास अधिकारी यांनी सांगितले आहे, यावेळी गटविकास अधिकारी यांनी असे आदेश दिले आहे की, पुढील पाच दिवसात कुठल्याही परिस्थितीत सेनगाव तालुक्याचे काम पूर्ण करणे आवश्यक आहे,

# जखमी घुबडाला दिले आरटीओ आधिकार्यांनी जिवनदान

■ लोकनेता न्यूज नेटवर्क

**उमरी । महेश पडोळे**

उमरी.मंडाळा गावाजवळील रस्त्यावर अज्ञात वाहणाने धडक दिल्याने जखमि अवस्थेत घुबड रस्त्यावर पडले तेव्हा रस्त्याने पेट्रोलिंग करत आसलेले साहयक मोटार वाहन निरीक्षक नितीन राख साहेब यांची सहज नजर त्या घुबडाकडे गेली तेव्हा त्यांच्या लक्षात आले की सदरील घुबड हे जखमी अवस्थेत आहे तेव्हा त्यांनी लगेच वाहन चालक अशोक टोमके यांना आपले वाहण परतुन घेण्यास सांगितले तेव्हा घुबडाला उचलुन त्याला बघितले तेव्हा तो जखमी अवस्थेत आहे असे लक्षात आले त्यांनी सोबत आसलेल्या साहयक मोटार वाहन निरीक्षक कलाले मॅडम व राख साहेब आणि चालक यांनी लगेच वनरक्षक आधिकारी वसंत सोपानराव मुंडे यांना फोन केला तेव्हा त्यांनी वनमजुर यांना रघुनाथ शिंदे व ढेरे यांना पाठवुन



दिले तेव्हा पशुवैद्यकिय अधिकारी यांनी तपासणी करून उपचार केला.

धावपळीच्या जीवनात त्या घुबडाला जखमि अवस्थेत न सोडता त्याला जिवदान देऊन साहयक मोटार वाहन निरीक्षक राख साहेब व साहयक मोटार वाहन निरीक्षक कलाले मॅडम व वाहन चालक अशोक टोमके यांनी त्या घुबडाला जिवदान दिले.

# शेतकरी नेते मारोती गीते यांचे विविध मागण्या संदर्भात तहसीलदार मार्फत सभापती अध्यक्ष महोदय यांना निवेदन

■ लोकनेता न्यूज नेटवर्क

**सेनगाव । महादेव हरण**

सेनगाव तालुक्यातील विविध मागण्यांसाठी तहसीलदारा मार्फत मा ,सभापती अध्यक्ष महोदय अर्थसंकल्प अधिवेशन २०२५ यांना निवेदन सादर करण्यात आले दिनांक ७ मार्च २०२५ रोजी शेतकरी नेते मारोती गिते यांनी अर्थसंकल्पीय अधिवेशनात केले नीवेदन सादर विषय सेनगाव तालुक्यातील शेतकरी व सर्वसामान्य जनतेच्या आर्थिक मदती च्या प्रश्न सोडविण्यासंदर्भात महोदय वरील विषयी अनुसरून माझ्या सेनगाव तालुक्यातील जनतेच्या आर्थिक मागण्या संदर्भात मारोती गीते ग्रामपंचायत पुरस्कृत सामाजिक कार्यकर्ता तथा शेतकरी नेते यांनी सेनगाव तालुक्यासह हिंगोली जिल्ह्यास सेनगाव तालुक्यातील शेतकऱ्यांना पिक विम्याची मंजूर २५% आग्रीम रक्कम तात्काळ शेतकऱ्यांच्या खात्यात जमा करण्यात यावी सेनगाव तालुक्यातील ग्रामीण भागामधील खराब



झालेले रस्ते तात्काळ दुरुस्त करावे सेनगाव तालुक्यातील शेतकरी सक्षम करण्यासाठी येलदरी धरणांमधून डावा कालवा तात्काळ काढण्यात यावा तालुक्यातील अतिवृष्टीमुळे नदी नाले काठावरच्या पूरग्रस्त शेतकऱ्यांचे आर्थिक अनुदान तात्काळ जमा शेतकऱ्यांच्या खात्यात करण्यात यावे व पूरग्रस्त शेतकऱ्यांना ९० ते ९५ टक्के पिक विमा तात्काळ देण्यात यावा मागणी तालुक्यातील जल जीवन मिशन अंतर्गत होणारी काम चांगल्या दर्जाचे करण्यात यावे व यामध्ये बोगसगिरी काम करणाऱ्या वर कठोर कारवाई करण्यात यावी तालुक्यातील दिव्यांग बांधवांच्या मानधनांमध्ये वाढ करण्यात यावी सेनगाव शहरामध्ये एसटी बस डेपो देण्यात यावा राज्यातील शेतकरी बांधवांचे पीक कर्ज कर्जमाफी तात्काळ देण्यात यावी वरील सर्व मागण्या सेनगाव तालुक्यातील शेतकरी व सर्वसामान्य जनतेच्या हिताच्या असून न्याय करणे योग्य आहे सेनगाव तालुक्यातील ग्रामीण रुग्णालय यांना जिल्हा उपकेंद्र घोषित करण्यात यावे अशा विविध मागण्या या निवेदनामध्ये देण्यात आल्या आहेत.

# देगलूर येथील अवैध रेती उत्खनन बंद करा–पर्यावरण प्रेमीयांची मागणी

■ लोकनेता न्यूज नेटवर्क

**देगलूर । जयपाल दावनगीरकर**

देगलूर तालुक्यातील तीन गावच्या नदीपात्रातून रात्रभर मोठ्या प्रमाणामध्ये अवैध रित्या रेतीची उत्खनन करून मोठ्या प्रमाणात वाहतूक होत असलेल्या वाहन व रेती माफियांना हिरवे कंदील दाखवणाऱ्या तलाठी, मंडळ अधिकाऱ्यांवर कारवाई करण्यात यावी अशी मागणी होत आहे.

देगलूर तालुक्यातील मौजे शेवाळा, शेकापूर व सांगवी उमर या तीन गावातील नदीपात्रातून उशीरा मध्यरात्री पासून ते पहाटे पाच वाजता पर्यंत रेती उत्खनन मोठ्या प्रमाणात करून वाटेल त्या चोरट्या मार्गाने वाहतूक केली जात आहे. या भागातील मंडळाधिकारी पुष्पलवार व नुकुलवार व त्यांचे अधिनस्त तलाठी तांदळे, गायकवाड, ठाकूर व भांगे यांनी रेतीमाफी यांना हिरवा कंदील दाखवत असल्याचे



आरोप होत आहे.

देगलूर येथील उपजिल्हाधिकारी कार्यालयात नव्यानेच रुजू झालेले प्रशिक्षणार्थी आयएएस अधिकारी श्रीमती शर्मा मॅडम यांनी अवैध धंद्यावर दुर्गाशक्ती दाखवून कारवाई करण्याची अपेक्षा होती पण ती अपेक्षा देगलूर तालुक्यातील पर्यावरण प्रेमीच्या पदरी निराशा पडली असल्याचे दिसून येत आहे. महसूल प्रशासनाचे गौण खनिज तपासणी नाका हे नरंगल ठेवण्या ऐवजी खानापूर फाटा येथे आहे. कारण की शेवाळा, शेकापूर, सांगवी उमर या तीन्ही गावच्या नदीपात्रातून रेती उत्खनन करून नरंगल येथून अनेक चोरट्या मार्गाने देगलूर शहराकडे व अन्य राज्यात जाण्यासाठी रेती माफियांना उपलब्धतेनुसार मार्गाचा अवलंबन सोयीनुसार करण्यासाठी मोकळा ठरलेला आहे. सदरील महसूल प्रशासनाचे तपासणी नाका खानापूर फाटा ऐवजी नरंगल चौरस्ता तपासणी नाका हलविल्यास रेतीस प्रतिबंध होईल असे नांदेडचे जिल्हाधिकारी राहुल कर्डिले यांच्याकडे निवेदनाद्वारे मागणी करण्यात आली आहे.

माहे जानेवारी २०२५ ते आज पर्यंत मंडळ अधिकारी पुष्पलवार व नुकुलवार तसेच तलाठी तांदळे, गायकवाड, ठाकूर व भांगे यांचे व्हाट्सअप, मोबाईल कॉल्स डिटेल व लोकेशनची तपासणी करावी व तसेच अवैध रित्या रेतीची उत्खनन होत असलेल्याची चौकशी करून बंद करावे चौकशीत दोषी आढळून आल्यास संबंधितावर कारवाई करण्यात यावी.अशी मागणी तालुक्यातील पर्यावरण प्रेमीयांकडून होत आहे.

# अनिषा शाळेच्या वार्षिक स्नेहसंमेलनाने आष्टीकरांची मने जिंकली

## महाभारत,शेतकरी व्यथा,शिव तांडव,सोशल मिडियाचे सादरीकरण ठरले लक्षवेधी

■ लोकनेता न्यूज नेटवर्क

**आष्टी । अण्णासाहेब साबळे**





महाभारतातील श्रीकृष्ण जन्म, द्रौपदीचे वस्त्रहरण,युद्धभूमीवरील सादरीकरण तसेच सद्यस्थितीत शेतकऱ्यांच्या समस्या,सोशल मिडीयाचा होणारा अती वापर आणि त्यातून विद्यार्थ्यांची बदलत चाललेली मानसिकता यासह विविध नृत्य,संगीत,नाटक आणि इतर कला प्रकार सादर करत आष्टी शहरातील अनिषा ग्लोबल स्कूलच्या विद्यार्थ्यांनी आष्टीकरांची मने जिंकली. शहरातील पिंपळेश्वर देवस्थान संचलित अनिशा ग्लोबल स्कूलचे वार्षिक स्नेहसंमेलन शुक्रवारी सायंकाळी ६ ते १० या वेळेत संपन्न झाले.या वार्षिक स्नेहसंमेलनाचे उद्घाटन उपविभागीय अधिकारी वसीमा शेख,गटशिक्षणाधिकारी सुधाकर यादव,संचालक ह.भ.प.रामदास डोरले महाराज,सुखलाल मुथा,प्रा.लक्ष्मण रेडेकर,संजय मुळे,सौ.प्राजक्ता धस यांच्यासह मान्यवरांच्या हस्ते संपन्न झाले.यावेळी विद्यार्थ्यांनी सोशल मीडियाच्या माध्यमातून दुरावत चाललेली माणसे त्यातून निर्माण होणाऱ्या समस्या आणि सोशल मीडियाच्या जाळ्यात अडकत जाणारी तरुणाई यावर प्रकाश टाकत सामाजिक संदेश देत कुटुंबातील वाढत असलेला विसंवाद याला सोशल मीडिया कशा पद्धतीने कारणीभूत आहे,हे विद्यार्थ्यांनी त्यांच्या नाटीकेतून सादर केले. तर सद्यस्थितीत शेतमालाला मिळणारा बाजार भाव,अवकाळी,गारपीट यासह अन्य कारणांनी पिकांचे होणारे नुकसान त्यामुळे कर्जबाजारी होत चाललेल्या शेतकऱ्यांच्या व्यथा सादरीकरणाने उपस्थितांच्या डोळ्यात पाणी आले.शिव तांडव नृत्याने,तर चिमुकल्यांच्या नव नवीन कला आणि संस्कृतींचा परिचय करून देत त्यांच्यातील कलात्मक क्षमतांनी उपस्थितांची वाहवा मिळवली.या कार्यक्रमासाठी शाळेच्या सर्व शिक्षकांनी परिश्रम घेतले.

# उमरी अजित पवार गट राष्ट्रवादी काँग्रेस तालुक्याच्या वतीने सभासद नोंदणी अभियान

■ लोकनेता न्यूज नेटवर्क

**उमरी । महेश पडोळे**

दि. ०६,०३,२०२५ रोज गुरुवारी सायंकाळी ठीक ०५ वाजता राष्ट्रवादी काँग्रेस पार्टी पक्ष कार्यालय उमरी येथे राष्ट्रवादी काँग्रेस पार्टी उमरी तालुक्याच्या वतीने सभासद नोंदणी अभियानास सुरुवात झाली आहे कार्यक्रमाचे अध्यक्ष मा माधवराव उर्फ दिलीपराव धर्माधिकारी जिल्हाध्यक्ष राष्ट्रवादी काँग्रेस पार्टी नांदेड,मा.शिवाजीराव धर्माधिकारी जिल्हा सरचिटणीस राष्ट्रवादी काँग्रेस पार्टी नांदेड, मा श्री शिवचरण डांगे पाटील विद्यार्थी जिल्हाध्यक्ष राष्ट्रवादी काँग्रेस पार्टी नांदेड व आजच्या कार्यक्रमाला प्रमुख उपस्थिती मा श्री डॉ, विक्रम देशमुख तळेगावकर प्रदेश






सरचिटणीस राष्ट्रवादी काँग्रेस पार्टी, ज्ञानेश्वर पाटील कदम शेलगावकर उमरी तालुका राष्ट्रवादी काँग्रेस पार्टी या सर्व मान्यवरांच्या उपस्थितीमध्ये आजचा नियोजित कार्यक्रम म्हणजेच सभासद नोंदणी अभियान, शहरातील सर्व सेलचे अध्यक्ष उपाध्यक्ष व पदाधिकारी उपस्थित होते तसेच उमरी तालुक्यातील राष्ट्रवादी काँग्रेस पार्टीचे सर्व सेलचे अध्यक्ष उपाध्यक्ष सर्व राष्ट्रवादी काँग्रेस पार्टी उमरी चे पदाधिकारी उपस्थित होते

सर्व पदाधिकाऱ्यांना सखोल असं मार्गदर्शन आमचे मार्गदर्शक मा श्री डॉक्टर विक्रम देशमुख तळेगावकर यांनी सर्वांना सभासद नोंदणी विषयी माहिती दिली व राष्ट्रवादी काँग्रेस पार्टीचे उमरी तालुका अध्यक्ष मा श्री ज्ञानेश्वर पाटील कदम शेलगावकर यांनी उपस्थितांना सभासद नोंदणी विषयी मार्गदर्शन केलं व आलेल्या सर्व मान्यवरांचा शाल श्रीफळ पुष्पहार देऊन उमरी तालुका राष्ट्रवादी काँग्रेस पार्टीच्या वतीने करण्यात आला आणि आपल्या नियोजित कार्यक्रमाचे अध्यक्ष मा श्री माधवराव उर्फ दिलीपराव धर्माधिकारी साहेब यांनी सुद्धा जमलेल्या उमरी तालुक्यातील व उमरी शहरातील राष्ट्रवादी काँग्रेस पार्टीच्या पदाधिकाऱ्यांना सखोल असं सविस्तर मार्गदर्शन केलं, आणि आजच्या कार्यक्रमाचे सूत्रसंचालन मा श्री रमेश हैबते राष्ट्रवादी सामाजिक न्याय विभाग जिल्हा उपाध्यक्ष नांदेड यांनी केले तर आभार प्रदर्शन राष्ट्रवादी काँग्रेस पार्टी उमरी तालुका उपाध्यक्ष मा श्री रावसाहेब पाटील वडजे नागठाणेकर यांनी केला आहे.

# जागतिक महिला दिनानिमित्त भाजपा जिल्हाध्यक्ष डॉ.संतुकराव हंबर्डेंच्या वतीने सफाई कामगारांचा सत्कार

■ लोकनेता न्यूज नेटवर्क

**नांदेड । गौतम बनसोडे**

जागतिक महिला दिनाचे औचित्य साधत भारतीय जनता पार्टीचे जिल्हाध्यक्ष डॉक्टर संतुकराव हंबर्डे यांच्या वतीने भाजपा जिल्हा संपर्क कार्यालयात आज महानगरपालिकेच्या महिला सफाई कामगारांचा सत्कार करण्यात आला.



राज्यातील महिलांच्या आर्थिक उन्नतीसाठी मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांच्या नेतृत्वाखाली राबविण्यात येत असलेल्या लाडकी बहिणी योजनेने असंख्य महिलांच्या जीवनात आर्थिक बदल घडवून आणला आहे . खऱ्या अर्थाने महिला सक्षमीकरणासाठी काम करणाऱ्या भारतीय जनता पार्टी आणि महायुती सरकारच्या वतीने महिलांच्या विकासासाठी विविध योजना राबविल्या जात आहेत. महिलांचाही सन्मान केला जात आहे . आज जागतिक महिला दिनाच्या निमित्ताने भाजपा जिल्हाध्यक्ष डॉक्टर संतुकराव हंबर्डे यांच्या संपर्क कार्यालयात महानगरपालिकेतील महिला सफाई कामगारांचा सत्कार करण्यात आला. यावेळी जिल्हाध्यक्ष डॉक्टर संतुकराव हंबर्डे यांच्यासह मराठवाडा संघटन मंत्री संजय कौडगे, जिल्हाध्यक्ष एडवोकेट किशोर देशमुख ,चैतन्यबापू देशमुख, बाळूभाऊ खोमणे, रामराव केंद्रे, लक्ष्मण ठक्करवाड , माणिकराव लोहगावे , शीतल खंडिल , डॉ . माधव उचेकर , डॉक्टर बालाजीराव गिरगावकर विजय गंभीरे, प्रवीण गायकवाड,सरदार दिलीपसिंघजी सोडी, बालाजी पाटील सकनूरकर, ड गंगाप्रसाद यन्नावार, दत्ता पाटील ढगे, प्रशांत दासरवार, यांच्यासह अनेकांची उपस्थिती होती.

# महाराष्ट्र राज्य द युवा ग्रामीण पत्रकार संघाच्या कार्याध्यक्ष पदी स्वरूप गिरमकर यांची नियुक्ती

■ लोकनेता न्यूज नेटवर्क

**वाघोली । संतोष कदम**

महाराष्ट्र राज्य द युवा पत्रकार संघ, संस्थापक अध्यक्ष अन्सार शेख यांच्या नेतृत्वात महाराष्ट्र राज्य कार्याध्यक्ष पदी स्वरूप गिरमकर यांची नियुक्ती राज्य कार्यकारिणीच्या मासिक बैठकीत एकमताने करण्यात आली. यावेळी संघटनेचे संस्थापक अध्यक्ष– अन्सार शेख,महिला राज्य अध्यक्ष–रुपाली सावंत,ईले.मिडिया राज्य अध्यक्ष रोहित वाळके,राज्य उपाध्यक्ष– जिवण मोहिते,राज्य सहसचिव –विवेकानंद फंड,राज्य संपर्क प्रमुख–बाळासाहेब कोठुळे आदी उपस्थित होते.राज्यातील पत्रकारांच्या न्याय, हक्कासाठी कायम सक्रिय असणारी संघटना म्हणून द युवा ग्रामीण पत्रकार संघ या संघटनेची ओळख असून संस्थापक अध्यक्ष अन्सार शेख यांच्या नेतृत्वात राज्यातील पत्रकारांचे प्रश्न जाणून घेत शासन दरबारी मांडत आहे .



आजही ग्रामीण भागातील पत्रकारांचे अनेक प्रश्न प्रलंबित आहेत, ग्रामीण पत्रकारांना अधिस्वीकृती कार्ड असेल किंवा पत्रकार सन्मान योजनेचा लाभ असेल ते मिळवून देण्यासाठी मी येणाऱ्या काळात प्रामाणिकपणे काम करणार असल्याचा विश्वास संघटनेचे नवनियुक्त राज्य कार्याध्यक्ष स्वरूप गिरमकर यांनी केला.

# जागतिक महिला दिनाच्या निमित्ताने रेखाताई बनसोडे यांचे मार्गदर्शन

■ लोकनेता न्यूज नेटवर्क

**नायगाव । प्रतिनिधी**

महिलांना स्वावलंबी व उद्योजक बनविण्यासाठी आणि स्वतःच्या पायावर उभे राहून जगातल्या कोणत्याही स्पर्धेमध्ये हिरारीने भाग घेण्यासाठी वेळोवेळी राजमाता जिजाऊ साहेब,ज्ञानज्योती सावित्रीबाई फुले, महाराणी अहिल्यादेवी होळकर,मुक्ता साळवे, माता रमाई या कर्तबगार महिलांचे वारंवार विचार आपल्या कामाई देवी बहुउद्देशीय सेवाभावी संस्थेच्या वतीने सामाजिक कार्यकर्त्या रेखाताई बनसोडे हे देत असून आज जागतिक महिला दिनाच्या निमित्ताने आयोजित कार्यक्रमात उपस्थित महिलांना शुभेच्छा त्यांनी दिले. नायगाव शहरातील शंकर नगर येथे जागतिक महिला दिनाच्या निमित्तानेआयोजित केलेल्या कार्यक्रमात प्रारंभी ज्ञानज्योती सावित्रीबाई फुले यांच्या



प्रतिमेचे पूजन आणि त्यांना अभिवादन कामाईदेवी बहुउद्देशीय सेवाभावी संस्थेच्या अध्यक्षा रेखाताई बनसोडे आणि त्यांच्या सहकारी भगिनींनी पूजन करून अभिवादन केले त्यानंतर रेखाताई बनसोडे यांच्या वतीने उपस्थित महिलांचा सन्मान करण्यात आला आणि उपस्थित महिलांना यावेळी रेखाताई बनसोडे वेगवेगळ्या विषयावर सखोल असे मार्गदर्शन केलेले आहे शेवटी त्यांनी कुठल्याही प्रसंगाला आपण तोंड द्यावे कुटुंब हे दोघांचे असून आपण आपल्या पतीला कोणत्याही संकटात किंवा कामात मदत केली पाहिजे तरच त्यांचे कुटुंब सुखी राहू शकतो असा मार्मिक सल्ला दिला आहे, विचारांची देवाणघेवाण करीत चांगले विचार आपण आत्मसात करावे आणि कुटुंबासह सर्वांसोबत मनमिळावू स्वभावाने वागले पाहिजे आपल्या चेहऱ्यावर प्रसन्नता दिसली की घरात सर्वांना आनंद वाटतो हि जाणीव असावी.असे सांगत या जागतिक महिला दिनाच्या निमित्ताने सर्व महिलांना भरभरून शुभेच्छा दिले यावेळी रेखाताई देवकर बनसोडे,सोनाली गोंडाळे.अर्चना चव्हाण. योगेश्वरी फुलारी.रेणू धुतराज.जोती मेटकर. किरण कोडापे. यासह अनेक महिलांची उपस्थिती होती.

# देगलूर तालुक्यातील अवैध रेती उत्खनन बंद करा मनसे तालुकाध्यक्ष मन्मथ परबते यांची मागणी

■ लोकनेता न्यूज नेटवर्क

**देगलूर । धनाजी जोशी**

देगलूर तालुक्यामध्ये रात्रभर मोठ्या प्रमाणामध्ये अवैध रेती उत्खनन व वाहतूक होत असून त्यांना पाठीशी घालणाऱ्या तलाठी व मंडळ अधिकाऱ्यांवर कारवाई करावी अशी मागणी महाराष्ट्र नवनिर्माण सेनेचे तालुकाध्यक्ष मन्मथ परबते यांनी जिल्हाधिकारी राहुल कर्डिले यांच्याकडे निवेदनाद्वारे केली आहे.

देगलूर तालूक्यातील मौजे शेवाळा, शेकापूर व सांगवी उमर येथील नदीपात्रातून रात्री दहा ते सकाळी सात वाजेपर्यंत रेती उत्खनन व पुष्पा २ स्टाईल चोरट्या मार्गाने वाहतूक केली जात आहे. या भागाचे मंडळ अधिकारी पुष्पलवार व नुकुलवार व त्यांचे अधिनस्त तलाठी तांदळे, गायकवाड, ठाकूर व व भांगे यांनी रेती माफियांना सहकार्य करीत असल्याचा आरोप मनसे तालुकाध्यक्ष मन्मथ परबते यांनी जिल्हाधिकाऱ्यांना दिलेल्या निवेदनात केला आहे. नव्यानेच





रुजू झालेल्या उपविभागीय अधिकारी प्रशिक्षणार्थी आयएएस अधिकारी श्रीमती शर्मा यांनी लक्ष देऊन कारवाई करणे अपेक्षित होते परंतु देगलूर येथील पर्यावरण प्रेमींच्या पदरी निराशा पडली आहे.महसूल प्रशासनाचे अवैध गौण खनिज तपासणी नाका खानापूर फाटा येथे आहे. परतू नरंगल येथून अनेक मार्ग देगलूर शहराकडे जाण्यासाठी रेती माफीयाला उपलब्ध असल्यामुळे रेती पथक खानापूर व फाटा येथे न ठेवता नरंगल येथे रेती तपासणी नाका हलविल्यास रेतीस प्रतिबंध होईल असे जिल्हाधिकारी कर्डीले यांच्या लक्षात आणून दिले आहे. तसेच माहे जानेवारी ते आज पर्यंतचे मंडळ अधिकारी पुष्पलवार व नुकुलवार आणि तलाठी तांदळे, गायकवाड, ठाकुर व भांगे यांचे व्हॉटस्प, मोबाईल कॉल्स डिटेल व लोकेशनची तपासणी करावी अशी मागणी महाराष्ट्र नवनिर्माण सेना तालुका अध्यक्ष मन्मथ परबते यांनी केला आहे.

# तीन गोवंशासह हाडाने भरलेले वाहन पकडले;चार लाखाचा मुद्देमाल जप्त

■ लोकनेता न्यूज नेटवर्क

**माहूर । राजकिरण देशमूख**

माहूर शहरातील वार्ड क्रमांक दहा मध्ये एका घरात कतलीच्या उद्देशाने आणलेले तीन गोवंश आणि गोवंशाच्या हाडाने भरलेले वाहन उभे असल्याची गोपनीय माहिती माहूर पोलीस ठाण्याचे सपोनि शिवप्रकाश मुळे यांना मिळाल्याने सपोनी शिवप्रकाश मुळे यांनी पोलीस होमगार्ड सह अचानकपणे धाड टाकून तीन गोवंश आणि हाडाने भरलेला टेम्पो असा एकूण चार लाख दोनशे रुपयांचा मुद्देमाल जप्त करून पाच जणांना ताब्यात घेत गुन्हा दाखल केल्याची घटना दि ८ रोजी १२:४० वाजता



घडली आहे.गोपनीय माहिती दाराकडून माहिती मिळाल्याने माहूर पोलिसांची पोलीस ठाण्याचे सपोनी शिवप्रकाश मुळे यांचे सह पोलीस कर्मचाऱ्यांनी वार्ड क्रमांक दहा येथे एका घरावर छापा मारला असता येथे कत्तलीच्या उद्देशाने आणलेले तीन बैल गोवंश आणि त्या घरासमोर महिंद्रा पिकप टेम्पो एम. एच.३०ए. बी १९९४ मध्ये सहा क्विंटल गोवंशाची हाडे असलेले जप्त करत गोवंश आणि हाडांनी भरलेला टेम्पो माहूर पोलीस स्टेशनला जमा करण्यात आला असून एकूण पाच आरोपीवर महाराष्ट्र प्राणी संरक्षण अधिनियम अंतर्गत गुन्हा दाखल करण्यात आला असून पुढील तपास सपोनी शिवप्रकाश मुळे यांच्या मार्गदर्शनाखाली पोहेका गजानन चौधरी पोहे का प्रकाश गेडाम पोहेका परमेश्वर कनकावाड गजानन जाधव संग्राम पवार ज्ञानेश्वर वेलदोडे नामदेव इंनकर आणि होमगार्ड संजय चव्हाण अरविंद राठोड आकाश गिनगुले अजय राठोड पंकज मुरकुटे उपस्थित होते सपोनी शिवप्रकाश मुळे यांच्या मार्गदर्शनाखाली पोहेका गजानन चौधरी हे पुढील तपास करत आहेत.

# निकिता धडेकरचे बी.एस् सी नर्सिंग परीक्षेत घवघवीत यश



■ लोकनेता न्यूज नेटवर्क

**नायगाव । प्रतिनिधी**

महाराष्ट्र युनिव्हर्सिटी ऑफ हेल्थ सायन्स नाशिक अंतर्गत गुरू गोविंदसिंघ मेमोरियल स्कुल ऑफ नर्सिंग नांदेड येथून बिएससी नर्सिंग परीक्षा मध्ये ५०० गुणांपैकी ३५० मार्क घेवुन कु.निकिता प्रकाश धडेकर ही प्रथम क्षेणीतुन उतीर्ण झाली आहे.

कु.निकिता धडेकर हीने शैक्षणिक क्षेत्रात अतिशय चिकाटीने अभ्यास करून यश संपादन केल्यामुळे या यशाबद्दल संगीता प्रकाश धडेकर (आई–वडील ) यशोदा माधव धडेकर (काका–काकू) शुभम,बालाजी धडेकर, साक्षी सिरसे (भाऊ–बहीण) दैनिक गाववालाचे जेष्ठ पत्रकार माधव पाटील चव्हाण व पांचाळ बाई आदी सर्वानी शॉल ,श्रीफळ,पुष्पगुच्छ देऊन कुमारी निकिता धडेकर हिचा सत्कार करून पुढील वाटचालीस आशीर्वाद रुपी भरभरुन शुभेच्छा देण्यात आल्या,कु निकीताच्या यशाबद्दल तालुक्यातुन व तिच्या आप्तजनाकडून अभिनंदनाचा वर्षाव होत आहे.

हे पत्रक,मालक,मुद्रक, प्रकाशक संपादक ज्ञानेश्वर भाऊसाहेब मुंढे यांनी न्यू गीता प्रिंटिंग प्रेस मिरकाळा ता गेवराई जि बीड ४३११२७ येथे छापून दैनिक लोकनेता कार्यालय हो.नं ५०,मेन रोड मिरकाळा ता गेवराई जि बीड ४३११२७ (महाराष्ट्र) येथे प्रकाशित केले आहे. मो.नं ८४५९९७७९०४

This Newspaper is printed by owner, printer, publisher editor Dyaneshwar Bhausaheb Mundhe at New Geeta Printing Press Mirkala Ta Gevrai District Beed 431127 and published at Dainik Lokneta Office Ho.No. 50, Main Road Mirakala Ta Gevarai District Beed 431127 (Maharashtra) Mo no 84599 77904